# सीमोल्लंघन



आज सीमोल्लंघन,

कसले करू या?

गावाच्या वेशीला,

कुठे बरं शोधू या?

माझे गाव तर,

आता राहिले नाही

सर्व विश्वच तर,

आता माझे घर राही!

सीमोल्लंघन करायला,

वेस शोधू तरी कुठे?

बाहेरच्या जगाला,

कुंपण, वेस, आहे तरी कुठे?

आतल्या मनाचे काय?

ते तर तसेच आहे.......
संकुचलेले....
तुझे-माझे करणारे...
स्वार्थाचे कवच घातलेले...
गढूळलेले....गैरसमजाचे,
विखाराचे विरजण घातलेले!
धुमसलेले....राग आणि द्वेषाचे
अंगार बाळगणारे!
असमाधानी....हव्यास ,
स्पर्धेने बरबटलेले!

अद्रुष्य भिंत घेतली आहे त्यांनी...
जिवलगांमध्ये!
काटेरी कुंपण घातले आहे त्यांनी...
नात्या नात्यांमध्ये!
मर्यादांचे रिंगण काढले आहे त्याने....
मना मना मध्ये!
रूढींचे जाते टाकलेय त्याने...
जनामनामध्ये!

चला......या मनाच्या वेशी ओळखूया

आजपासून त्याच्या बाहेर पडण्याचा

प्रयत्न करू या!

नकारात्मक मनाच्या,

या सीमा नक्की पार करू या!

हे सीमोल्लंघन,

नक्की करू या!

हे सीमोल्लंघन ,

नक्की करू या!

**......चित्रा मेहेंदळे**